# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे

## कोल्हापूर विभागीय मंडळ , कोल्हापूर

539 कसबा करवीर राजेंद्र नगर कोल्हापूर- 416 004

website : www.sscboardkolhapur.in & www.mahahsscboard.gov.in,Phones:Chairman 2690829 [O] 2690679 [R], Secretary 2691405 [O] 2656044 [R]. PBX - 0231-2696101, 2696102, 2696103 FAX : [0231] 2690758 E-Mail: divsec.kop@gmail.com

जा. क्रं /कोविमं/उमा/गोपनीय/७५४०
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर
दिनांक :- ०१/०९/२०२३

प्रति,

प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा/सांगली/कोल्हापूर

**विषय :- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षेत होणा-या गैरप्रकाराबाबत...**

**संदर्भ - १) राज्य मंडळ पत्र क्र. रा.मं./परीक्षा - २ / ३२८७ दि. २६/०७/२०२३ चे पत्र.**
**२) स्वीय सहायक शालेय शिक्षण मंत्री दि.०३/०३/२०२३ चे पत्र.**

वरील संदर्भिय विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेच्या प्रात्यक्षिक/तोंडी परीक्षा हया कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर घेतल्या जातात. सदर परीक्षेमध्ये कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर गैरप्रकार होत असल्याची तक्रार शासनाकडे प्राप्त झालेली आहे.

तक्रारदाराने तक्रार अर्जात नमूद केले आहे की, इ. १२ वी बोर्ड प्रात्यक्षिक परीक्षेत सर्वच ठिकाणी मोठया प्रमाणात गैरप्रकार घडून येत आहेत. इ.११ वी व १२ वी च्या तुकडया बंद पडू नये म्हणून फक्त दाखले गोळा करुन कॅटलॉगला विद्यार्थी संख्या दाखवली जाते. वर्षभर बोगस हजेरी लावली जाते. कलाशाखेत २० टक्के विद्यार्थी वर्षभर एकही दिवस कनिष्ठ महाविद्यालयात येत नाहीत. कोणतीही चाचणी व प्रात्यक्षिक न देता त्यांना उत्तीर्ण करुन १२ वी मध्ये प्रवेश दिला जातो.

इ.१२ वी मध्येही कनिष्ठ महाविद्यालयाला आल्यानंतर विद्यार्थी वर्षभर उपस्थित राहत नाही. कोणतीही परीक्षा देत नाहीत व बोर्डाच्या परीक्षेचा परीक्षा फॉर्म भरतात. प्राचार्यांच्या सांगण्यावरुन त्यांची संपूर्ण हजेरी लावण्यात येते. इयत्ता १२ वी बोर्ड परीक्षेस प्रात्यक्षिक परीक्षा दिली जात नाही. तोंडी परीक्षेलाही गैरहजर असतो. तरीसुध्दा प्राचार्यांच्या सांगण्यावरुन विद्यालयाचा व विषयाचा निकाल चांगला लागावा म्हणून अशा विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक/तोंडी परीक्षेत पैकीच्या पैकी गुण दिले जातात. संस्थेने प्राचार्यांना /शिक्षकांना प्रात्यक्षिक परीक्षेत पूर्ण गुण दयावयास सांगितल्यामुळे शिक्षकांची कुचंबना होते.

तरी सदर परीक्षा पध्दतीमधील प्रात्यक्षिक/तोंडी परीक्षा बंद करण्यात यावी असे कळविले आहे.

तरी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु./मार्च २०२४ पासून पुढे वरील तक्रारीची दखल घेवून आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात असे प्रकार घडणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी. अशा प्रकाराबाबत काही तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाविरुध्द मंडळ नियमानुसार कडक कारवाई करण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.

**(पोवार डी.एस.)**
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत माहितीस्तव,

१. मा. सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.

२. मा. शिक्षणउपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर,
आपल्या कार्यालयाकडून वर नमूद तक्रारींच्या अनुषंगाने योग्य ती दखल घेवून आपल्या स्तरावरुन योग्य ती कार्यवाही करावी.

३. शिक्षणाधिकारी (माध्य) जिल्हा परिषद सातारा /सांगली / कोल्हापूर.